CNR No. : MHTH07-000002-2018

दाखल दिनांक : ०१/०१/२०१८
नोंदणी दिनांक : ०१/०१/२०१८
निकाल दिनांक : २१/०९/२०१८
कालावधी : व.०० म.०८ दि.२०

**कल्याण येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, यांच्या न्यायालयात**

**(श्री एस. टी. त्रिपाठी, पिठासीन अधिकारी यांच्या समोर)**

**विवाह याचिका क्रमांक. १/२०१८**
निशाणी क्रमांक

श्री सतिष अंगद सींह
वय : ३२ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
रा. : कमला नेहरू नगर,
धोबीघाट रोड, राजकुमार किराणा स्टोअर जवळ,
उल्हासनगर ४२१ ००१,
जि. ठाणे ................अर्जदार क्र.१

आणि

श्रीमती स्नेहा सतिष सींह
उर्फ स्नेहा रामधनी जैस्वार
वय : २७ वर्षे, व्यवसाय - नोकरी,
रा. : द्वारा रामधनी जैस्वार
जी-५, ऑर्डनन्स इस्टेट,
अंबरनाथ ४२१ ५०२, जि. ठाणे ................अर्जदार क्र.२

---

अर्जदार क्र. १ व २ तर्फे वकील श्री पी. एस. काळे

---

## न्यायनिर्णय

(निकाल दिनांक २१ सप्टेंबर, २०१८)

सदरची याचिका हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (ब) प्रमाणे परस्पर संमतीने विवाह विच्छेदनाचा हुकूमनामा मिळण्याकरीता दाखल केली आहे.

२ अर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. २ यांचा विवाह दिनांक १०.०३.२०१० रोजी कल्याण येथे हिंदू धर्म पध्दतीनुसार झाला व त्यांनी एकत्र संसार करण्यास सुरवात केली. सदर लग्नसंबंधापासून त्यांना कोणतेही अपत्य नाही. काही काळ एकत्र राहिल्यानंतर सुध्दा त्यांच्यात एकमेकांची पसंती नापसंती, परस्पर विरोधी स्वभाव व एकमेकांची उणीदूणी काढणे, असे मतभेद उद्भवले. त्यांच्यानुसार त्यांचे एकमेकांसोबत राहणे अशक्य झाले आहे. उभयपक्ष दि. २१.०८.२०१० पासून विभक्त रहात आहेत. घटस्फोटाचा अर्ज दाखल केल्यानंतर उभय पक्षामध्ये समेट घडवून आणण्याकरीता सदर प्रकरण सहा महिन्यांपर्यंत प्रलंबित ठेवण्यात आले. परंतु त्यांच्यात असलेल्या मतभेदानुसार त्यांचे एकत्रित येणे अशक्य दिसत आहे. दोघेही पक्ष एकमेकांकडून भविष्यात कुठलीही मागणी करणार नाही असे मान्य केले आहे. त्यांच्यात सामोपचाराने तडजोडीची काहीही शक्यता नसल्याने त्यांनी संमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला आहे व त्याकरिता सदरची याचिका दाखल केली आहे.

३ वरील उभय पक्षांच्या याचिकेनुसार खालील मुद्दे माझ्या विचाराधीन असून त्यावरील माझा निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदविला आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अर्जदार हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (बी) अंतर्गत परस्परसंमतीने विवाह विच्छेदन करुन मिळणेस पात्र आहेत काय? | होय. |
| २ | काय आदेश व हुकूमनामा ? | सदरची याचिका मंजुर करण्यात आली. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा कमांक १ बाबत :–**

४ अर्जदारांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ पुराव्याच्या स्वरुपात आपले शपथपत्र निशाणी ६ व ७ वर दाखल केले व आपले कथन सविस्तर मांडले.

५ त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांचा विवाह दिनांक १०.०३.२०१० रोजी झाला असून ते दि. २१.०८.२०१० पासून विभक्त राहात आहेत व त्यांच्यामधील गंभीर मतभेद असल्यामुळे त्यांचे एकत्र राहणे अशक्य झाले आहे. अर्जदार क्र. २ हिने तिचा भुत, वर्तमान व भविष्यकाळातील पोटगीचा हक्क कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे. दोन्ही पक्षांनी आपआपल्या वस्तुंची देवाण घेवाण केलेली आहे. दोन्ही पक्षकार एकमेकांच्या विरूध्द त्यांच्या स्थावर किंवा जंगम मिळकतीमधे भविष्यात कोणत्याही प्रकारचा हक्क किंवा अधिकार सांगणार नाहीत. उभय पक्षांनी त्यांच्या विवाह विच्छेदनास राजीखुशीने संमती दिल्याचे व ती संमती आजही कायम असल्याचे दिसून येत आहे.

६ वरील चर्चेनुसार, तसेच अभिलेखावरील उपलब्ध पुरावा व दस्तांचे अवलोकन करता उभय पक्षांचे कथन मान्य करण्यास दुमत नाही. म्हणुन मी असे गृहित धरतो की अर्जदार हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३ (बी) अंतर्गत परस्परसंमतीने विवाह विच्छेदन करुन मिळणेस पात्र आहेत. त्यामुळे वरील मुद्दयांचे उत्तर मी होकारार्थी नोंद करीत आहे.

**मुद्दा कमांक २ बाबत :–**

७ वरील चर्चेनुसार वरील मुद्दयाचे उत्तर होकारार्थी नोंद केल्यामुळे सदरची याचिका मंजूर होणेस पात्र आहे. परिणामत: सदर

मुद्दयांचे उत्तर नोंद करण्यासाठी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१ सदरची याचिका मंजूर करण्यात येते.

२ अर्जदार क्र.१ श्री सतिष अंगद सींह आणि अर्जदार क्र.२ श्रीमती स्नेहा सतिष सींह उर्फ स्नेहा रामधनी जैस्वार यांचा दिनांक १०.०३.२०१० रोजी झालेला विवाह, हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३ब प्रमाणे या आदेशान्वये हुकुमनाम्याच्या तारखेपासून विच्छेदित झाल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३ अर्जदारांना आदेशाची प्रमाणित प्रत मागणी केल्यास विनामूल्य देण्यात यावी.

४ उभय पक्षांनी आपआपला खर्च सोसावा.

५ येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

ठिकाण : कल्याण. (एस. टी. त्रिपाठी)
दिनांक : २१/०९/२०१८ दिवाणी न्यायाधीश व. स्तर,कल्याण.